
तरुण भारत



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

# यशवंतराव चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. पी.एस.पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. प्रकार पवार, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे भाग्यविधाते व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. प्रकाश पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह यशवंतराव चव्हाण स्कूलचे अध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. प्रकाश पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत उपस्थित होते.

13 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅक मूल्यांकन होणार सोमवारपासून

## विद्यापीठ प्रशासन सज्ज; कुलगुरू डॉ. शिर्के यांनी घेतला विभागवार आढावा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाची नॅक मूल्यांकनाची तयारी पूर्ण झाली असून दोन दिवसांपासून आढावा बैठका सुरू आहेत. सोमवार (ता. १५) पासून मूल्यांकनाला प्रारंभ होणार असून बुधवारी (ता. १७) मूल्यांकन पूर्ण होईल. रविवारी (ता. १४) संध्याकाळी सहा जणांची मूल्यांकन समिती कोल्हापुरात येणार आहे. विद्यापीठाची तयारी झाली असून आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विभागवार तयारीचा आढावा घेतला. वेगवेगळ्या अधिविभागात कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

नॅक मूल्यांकन पद्धती बदलल्यानंतर पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन होत आहे. यासाठी सप्टेंबर २०१९ मध्ये विद्यापीठाने नॅकच्या पोर्टलवर माहिती दिली होती. त्याच्या आधारे विद्यापीठाचे संख्यात्मक मूल्यमापन पूर्ण झाले. बदललेल्या पद्धतीनुसार ७० टक्के मूल्यांकन संख्यात्मक आणि ३० टक्के मूल्यांकन गुणात्मक पद्धतीनुसार होते. संख्यात्मक मूल्यांकनाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता गुणात्मक मूल्यांकनासाठी सहा जणांची समिती पाहणी करणार आहे. सुरुवातीला समितीचे औपचारिक स्वागत होईल. त्यानंतर विद्यापीठाची माहिती, विशेष उपलब्धी याबाबत माहिती सांगितली जाईल. त्यानंतर पुढील तीन दिवसांत समिती सदस्य विविध अधिविभागांना भेटी देतील. कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. यासाठी प्रत्येक अधिविभागाने स्वतंत्रपणे सादरीकरण बनवले आहे. यामध्ये त्या विभागातील विद्यार्थी संख्या, आत्तापर्यंत पीएच. डी. झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, प्राध्यापकांचे सायटेशनन्स, प्लेसमेंट



### अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

नॅक मूल्यांकनाची सर्व तयारी ही अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून पार पाडली जात आहे. सुरुवातीला संगणक अधिविभागाचे प्रमुख डॉ. आर. के. कामत या कक्षाचे प्रमुख होते. त्यानंतर डॉ. जुगळे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. देशमुख यांनी या कक्षाचे काम पाहिले आहे. या सर्वांच्या कार्यकाळात नॅकची तयारी पूर्ण झाली आहे.

सामाजिक उपक्रम याबाबतची माहिती दिलेली आहे. विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या अंतर्गत याचा आढावा घेतला आहे. सादरीकरणासाठी अधिविभागत स्वतंत्र कक्ष बनवण्यात आले आसून यामध्ये कोरोना प्रतिबंधक उपाययोजनाची अंमलबजावणी केली आहे. दरम्यान आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रत्येक विद्यापीठात विविध अधिविभागातील कर्मचारी, अधिकाऱ्यांशी संवाद साधला. नॅक मूल्यांकनाची तयारी, या कालावधीत घेण्याची काळजी याचा आढावा घेऊन

13 MAR 2021

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅक' मूल्यांकन समिती उद्या येणार

## शिवाजी विद्यापीठ सज्ज : ३० टक्के गुणात्मक पाहणी होणार

कोल्हापूर : राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्या वतीने (नॅक) शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन करण्यासाठी नॅक पीअर टीम (समिती) उद्या, रविवारी सायंकाळी विद्यापीठात येणार आहे. उदयपूर येथील एम. एल. सुखाडिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती सोमवार (दि. १५) ते बुधवार (दि. १७) पर्यंत मूल्यांकन करणार आहे. या मूल्यांकनासाठी विद्यापीठ प्रशासन आणि विविध अधिविभाग सज्ज झाले आहेत.

विद्यापीठाने मूल्यांकनाची तयारी सुरू केली. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक आणि विविध ३४ अधिविभागांच्या सादरीकरणाचा अहवाल तयार झाला आहे. विद्यापीठ परिसराची स्वच्छता, इमारतींच्या रंगरंगोटीचे काम पूर्ण झाले. विद्यापीठातील फूटपाथ, झाडांवर पट्टे मारणे, आदी कामे शुक्रवारी सुरू होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी विविध अधिविभागांना भेटी देऊन सादरीकरणाच्या ठिकाणांची पाहणी केली. डॉ. शिर्के यांनी शुक्रवारीशिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून सूचना केल्या.

### दोन टप्प्यांत मूल्यांकन

संख्यात्मक आणि विश्लेषणात्मक अशा दोन टप्प्यांमध्ये नॅक मूल्यांकन होणार आहे. त्यातील ७० टक्के संख्यात्मक माहिती 'नॅक'ला सादर केली आहे. उर्वरित ३० टक्के विश्लेषणात्मक मूल्यांकनासाठी समिती विद्यापीठाला भेट देणार असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले.



१3 MAR 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निधीअभावी अडले प्रदूषण रोखणारे यंत्र

## एआयआरकडून चाचणी होण्याची आवश्यकता; सुमित पोवारचे इनोव्हेशन

सकाळ वृत्तसेवा



सुमित पोवार

कोल्हापूर, ता. १२ : मोटारींमुळे होणारे हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी कॅथॅलिक कंट्रोलचे यंत्र येथील सुमित संतोष पोवार याने बनविले आहे. हे यंत्र सायलेन्सर आणि इंजिनच्यामध्ये लावल्यास हवेत होणारे ४० टक्के प्रदूषण कमी होते, असा त्याचा दावा आहे. मुंबई आयआयटीने याला मान्यता दिली असून, यातून हवेचे प्रदूषण कमी होते हे मान्य केल्याचे सुमित सांगतो. सध्या 'एआयआर'कडे त्याची चाचणी करण्यासाठी निधी नसल्याची नाराजी सुमितने व्यक्त केली. एआयआरकडून चाचणी यशस्वी झाल्यास अवघ्या दोन-अडीच महिन्यांत हे यंत्र प्रत्यक्षात वापरता येईल, असा विश्वास सुमितला आहे.

सुमितच्या वडिलांचे मोटार दुरुस्तीचे गॅरेज आहे. मोटारीचे गरम झालेले इंजिन थंड करण्यासाठी किंवा त्याचे तापमान कमी करण्यासाठी ज्या पद्धतीने 'रेडिएटर'चा वापर होतो त्याच पद्धतीने हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी काय करता येईल, या विचारातून 'कॅथॅलिक कंट्रोल' यंत्र तयार करण्याची कल्पना त्याचे वडील संतोष यांना पंधरा वर्षांपूर्वी सुली होती. त्यानंतर सुमितने यात पुढाकार घेत हे यंत्र प्रत्यक्षात आणले.

मुंबईतील बेस्ट, कोल्हापूरची केएमटी यांसह रेल्वेच्या इंजिनला हे यंत्र बसविता येते. त्यामुळे हवेतील प्रदूषण रोखण्यास मदत होणार आहे. काही ठिकाणी चाचणीही झाली आहे. मात्र केवळ ॲटोमिक रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआयआर) च्या मान्यतेनंतरच त्याचा वापर देशातील सर्वच वाहनांना करता येणार आहे. याचे पेटंटही घेतले आहे. गुरदेवसिंह व्होरा यांचेही सहकार्य लाभत आहे.

### विद्यापीठात लॅब झाल्यास विद्यार्थ्यांना फायदा

यंत्रांची चाचणी करण्यासाठी कोल्हापूर परिसरात लॅब नाही. यासाठी 'एआयआर'कडे जावे लागते. तेथे सुमारे पाच-सहा लाख रुपये खर्च होणार आहे. सध्या निधी नाही म्हणून चाचणी थांबली आहे. हीच लॅब शिवाजी विद्यापीठात झाली तर अनेक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची सोय होईल, खर्च कमी होईल, असे ही सुमितने सांगितले.